नियम ३

जोडपत्र 'अ'

सा - पु
२०२३
३०।७।१८
मनपा स्विय

केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती अर्ज

प्रति

मा. जनमाहिती अधिकारी सो
नगर सचिव विभाग
मीरा - भाईंदर महानगरपालिका
भाईंदर (प) ता. जि. ठाणे

नगरसचिव विभाग
स.व./न.प./ज.प./आ.क्र ५१
दिनांक : ०१/०८/१८ २०१८-१९

१) अर्जदार :- माधवी यशवंत गायकवाड (9222852940)

२) पत्ता :- A-1/201, 202 सिल्वर पार्क, मीरा - भाईंदर रोड मीरा रोड (पूर्व) ता. जि. ठाणे 401107

३) माहितीचा विषय :- मीरा - भाईंदर महानगरपालिका उद्यान व वृक्षप्राधिकरण समितीची माहिती मिळणेबाबत

४) माहितीचा कालावधी :- १ ऑगस्ट २०१७ ते आजपर्यंत

५) माहितीचे वर्णन

A) सदर समितीच्या स्थापना / गठित करण्याबाबत महासभा ठरावाची प्रत मिळावी (साक्षांकित)

B) सदर समितीच्या सदर कालावधीतील सर्व सभांच्या नोटिस, गोषवारा, विषयपत्रिका, ठराव यांच्या माहितीच्या साक्षांकित प्रत मिळावी

C) सदर समितीच्या सर्व सदस्यांना देण्यात आलेल्या सभा भत्ता / मानधन याची नाव व मानधन खर्च वर्गीकरणात्मक माहितीच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती मिळावी

६) माहिती आवश्यक :- व्यक्तीशः

स्थळ :- भाईंदर

दिनांक :- 26-07-2018

अर्जदार
( माधवी य. गायकवाड )

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय**

**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401101**

## नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ 49 /2018-19 दि. 09 / 08 /2018

**प्रति,**

**श्रीम. माधवी यशवंत गायकवाड,**

**ओ-1/201,202, सिल्वर पार्क, मिरा भाईंदर रोड,**

**मिरारोड (पूर्व)**

**विषय :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका उद्यान व वृक्ष प्राधिकरण समितीची माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 26/07/2018 रोजीचा माहिती अधिकार नियमा अंतर्गत प्राप्त पत्र. (पत्र प्राप्त दि. 01/08/2018)**

**महोदया,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण उद्यान व वृक्ष प्राधिकरण समितीबाबत माहितीची मागणी केलेली आहे. आपल्या पत्रातील मुद्दा क्र. "ए" नगरसचिव विभागशी निगडीत असल्याने उक्त मुद्याची माहिती देणेसाठी सामान्य प्रशासन विभाग, मि.भा.मनपा यांचेमार्फत आपल्या संदर्भित अर्जाची छायांकित प्रत नगरसचिव विभागात वर्ग केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस मा. महासभा दि. 26/07/2018, प्रकरण क्र. 38 या ठरावाची सत्यप्रत या पत्रासोबत जोडून देत आहोत. तसेच आपल्या पत्रातील मुद्दा क्र. बी व सी उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाशी निगडीत असल्याने सदर पत्राची मुळ प्रत सामान्य प्रशासन विभागामार्फत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागास वर्ग करणेत आली आहे. तरी कृपया सदर मुद्या क्र. बी व सी बाबतची माहिती संबंधीत विभागाकडून घ्यावी.

सदर माहिती नगरसचिव विभागातील उपलब्ध अभिलेख्यावरुन देण्यात आली असुन, या माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

**(कैलास दामोदर म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

Tushar
01-08-18

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा सभा दि. १६/१०/२०१७

**प्रकरण क्र. ०५ :-** **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.**

ठराव क्र. ०३ :-

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर १५ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. भारतीय जनता पार्टी - ६१

२. शिवसेना - २२

३. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस - १२

याप्रमाणे वृक्षप्राधिकरण समितीवर खालील १५ सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. म्हात्रे विनोद काशीनाथ | भारतीय जनता पार्टी |
| २. | श्री. शेट्टी गणेश गोपाळ | भारतीय जनता पार्टी |
| ३. | श्री. म्हात्रे सचिन केसरीनाथ | भारतीय जनता पार्टी |
| ४. | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | भारतीय जनता पार्टी |
| ५. | श्रीम. सोंस नीला बर्नाड | भारतीय जनता पार्टी |
| ६. | श्रीम. कांगणे मीना यशवंत | भारतीय जनता पार्टी |
| ७. | श्री. दुबे मनोज रामनारायण | भारतीय जनता पार्टी |
| ८. | श्री. भोईर गणेश गजानन | भारतीय जनता पार्टी |
| ९. | श्रीम. पारधी सुजाता यशवंत | भारतीय जनता पार्टी |
| १०. | श्रीम. बेलानी हेमा राजेश | भारतीय जनता पार्टी |
| ११. | श्री. कमलेश यशवंत भोईर | शिवसेना |
| १२. | श्री. अनंत शिर्के | शिवसेना |
| १३. | श्री. एलायस बांड्या | शिवसेना |
| १४. | श्री. मेहरा राजीव ओमप्रकाश | कॉंग्रेस लोकशाही आघाडी |
| १५. | श्री. शेख अमजद गफार | कॉंग्रेस लोकशाही आघाडी |

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सत्य प्रत

नगर सचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका